# जनसंपर्क अधिकारी कार्यालय,
# ठाणे शहर पोलीस

THANE POLICE COMMISSIONERATE

**प्रेसनोट** **दि. १७/०८/२०२४**

**उत्तरप्रदेश सरकारकडून प्रत्येकी ५० हजार रूपये बक्षीस घोषीत केलेल्या खुनाच्या गुन्हयातील ७ वर्षापासुन फरारी असलेल्या दोन आरोपींना खंडणी विरोधी पथक व व एसटीएफ प्रयागराज उत्तरप्रदेश पोलीस यांचेकडून संयुक्त कारवाईत अटक**

---

दिनांक १६/०८/२०२४ रोजी एसटीएफ पोलीस, उत्तरप्रदेश यांचेकडून खंडणी विरोधी पथकास माहिती मिळाली की, मेजा पोलीस स्टेशन, प्रयागराज, उत्तरप्रदेश येथील गु.र.नं. ३६५/२०१७ भादवि कलम ३०२,५०४ ५०६ मधील ७ वर्षापासून फरारी असलेले आरोपी १) मोनु शुक्ला, २) रजत शुक्ला हे फरार असून त्यांचे विरूद्ध उत्तरप्रदेश सरकार कडून प्रत्येकी ५० हजार रूपये बक्षीस जाहीर झाले आहे. सदरचे आरोपी सध्या वसंत विहार, ठाणे परिसरात लपुन राहत असल्याची माहिती त्यांना मिळाली असून त्यांना अटक करणेकामी त्यांनी पोलीस मदत मागितली. सदरबाबत मा. वरिष्ठांना माहिती दिली असता त्यांनी खातरजमा करून योग्य ती कारवाई करणेबाबत आदेशीत केल्याने खंडणी विरोधी पथकाकडील पोलीस अधिकारी अंमलदार यांनी एसटीएफ उत्तरप्रदेश यांचेकडून नमुद आरोपींची इत्यंभुत माहिती मिळवुन त्यांचे मोबाईल फोन नंबर मिळवुन त्याचे सीडीआरचे तांत्रीक विश्लेषण केले असता सदर आरोपी हे निळकंठ वुडस, मुल्ला बाग, ठाणे येथे असल्याची माहिती मिळाली असता पथकाने नमुद ठिकाणी जावुन तेथील परिसरातील रहिवाशांकडे गोपनियरित्या चौकशी केली असता नमुद इसम निळकंठ वुडस समोरील चौकात, मुल्ला बाग, ठाणे येथे असल्याची माहिती मिळाली असता सदर मिळालेल्या माहितीचे आधारे सदर ठिकाणी पोलीसांनी नमुद इसमांचा शोध घेतला असता दोन इसम संशयास्पदरित्या फिरतांना आढळून आले त्यांना नमुद पथकाने ताब्यात घेवुन त्यांचेकडे तपास केला असता त्यांनी सुरूवातील उडवाउडवीची उत्तरे देवुन खरी माहिती सांगण्याचे टाळले. नमुद इसमांना जवळील चितळसर पोलीस स्टेशन येथे नेवुन त्यांचेकडे आणखी तपास केला असता त्यांनी त्यांचे नाव पत्ता १) मोनु उर्फ विभास उर्फ प्रशांत कपिल शुक्ला, वय ३० वर्षे, २) रजत उर्फ प्रभात कपिल शुक्ला वय २६ वर्षे, दोन्ही रा. रूम नं. प्लॉट नं. १२४/१४ डी, पहिला माळा, जुना म्हाडा वसाहत, वसंत विहार, ठाणे, मुळ रा. ग्राम अठखरीया, पोस्ट शुक्लपुर, थाना मेजा, जिल्हा प्रयागराज, उत्तरप्रदेश असे सांगून त्यांचा मेजा पोलीस स्टेशन, गु.र.नं. ३६५/२०१७ भादवि कलम ३०२,५०४ ५०६ मधील मयत इसम नामे शंकर शुक्ला याचे खुनाचे गुन्हयात सहभाग असल्याची कबुली दिली. नमुद इसमांना दिनांक १६/०८/२०२४ रोजी २२:१५ वा ताब्यात घेवुन एसटीएफ, प्रयागराज पोलीस, उत्तरप्रदेश यांचे ताब्यात पुढील कारवाईकरीता सुपुर्द केले आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर श्री. आशुतोष डुंबरे, मा. पोलीस सह आयुक्त, श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंजाबराव उगले, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री शिवराज पाटील, मा. सहायक पोलीस आयुक्त, शोध –२, गुन्हे शाखा, श्री राजकुमार डोंगरे यांचे मार्गदर्शनाखाली एसटीएफ पोलीस, प्रयागराज, उत्तरप्रदेश कडील पोउनि/धर्मेंद्र सिंह, पोउनि/रणेंद्र सिंह, मुख्य आरक्षी अभिशेक मिश्रा, मुख्य आरक्षी विकास तिवारी, मुख्य आरक्षी अजयकुमार यादव, आरक्षी किसनचंद, आरक्षी चालक रविकांत सिंह तसेच खंडणी विरोधी पथकाचे वपोनि/श्री. मालोजी शिंदे, सपोनि/भुषण कापडणीस, सपोनि/सुनिल तारमळे, पोउनि/ विजयकुमार राठोड, पोउनि/सुभाष तावडे, सपोउनि/कल्याण ढोकणे, सपोउनि/संजय बाबर, पोहवा/योगीराज कानडे, पोहवा/संदिप भोसले, पोहवा/संजय राठोड, मपोहवा/शितल पावसकर, मपोशि/मयुरी भोसले, पोशि/तानाजी पाटील, पोशि/अरविंद शेजवळ, चापोना/भगवान हिवरे यांनी केली आहे.

( मालोजी शिंदे )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खंडणी विरोधी पथक,
गुन्हे शाखा, ठाणे शहर.